
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# संत एकनाथांच्या साहित्यातील समाजदर्शन

प्रा. डॉ. राजेंद्र वाटाणे
सहयोगी प्राध्यापक , तायवाडे महाविद्यालय, महादुला कोराडी.

## प्रस्तावना :



संत साहित्य हे भारतीय संस्कृतीचे आणि अद्वैत विचारसरणीचे संचित आहे. संतांनी आपली वाणी आणि लेखनी लोककल्याणासाठी खर्ची घातली. त्यामुळेच त्यांच्या व्यक्तित्वात कृती आणि उक्तीचा अपूर्व मेळ आढळतो. 'जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत' या उक्तीप्रमाणे संतांनी लोकोद्धाराचे निरंतर कार्य केले. संत साहित्याचा समावेश धार्मिक वाङ्मयात केला जातो. यात वावगे काहीच नाही. परंतु धर्मापासून आजचे साहित्य बरेच दुरावलेले दिसते. त्यामुळे सर्वच संतसाहित्य हे धर्मसाहित्य असते पण सर्वच धार्मिक साहित्य हे संतसाहित्य होऊ शकत नाही. यावरून संतसाहित्याचे निराळेपण सहजच लक्षात येते. ''संतांना धर्माच्या पार्थिव अंगापेक्षा अपार्थिव स्वरूपासंबंधी विशेष आकर्षण होते. त्यामुळे संतसाहित्याचे शाश्वत धर्माशी थेट नाते प्रस्थापित होते.''[1] यावरून धर्मतत्त्व आणि सर्वसामान्य माणूस यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे संत असल्याचे स्प होते. संतांची ही परंपरा बाराव्या शतकापासून तर सोळाव्या शतकापर्यंत कशी विकसित होत गेली हे संत बहिणाबाईंच्या पुढील अभंगावरून सहजच लक्षात येते.

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।
नामा तयाचा किंकर। तेणे केलासे विस्तार।।
एकनाथ जनार्दन। स्तंभ दिला भागवत।।
तुकाझालासे कळस। भजन करा सावकाश।।

संत बहिणाबाईच्या या उक्तीप्रमाणे भागवत संप्रदायाच्या भक्तिमंदिराला स्तंभ देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संत एकनाथांनी केले. संत एकनाथांचा जन्म इ.स. 1533 साली पैठण येथे झाला. त्यांचे घराणे विद्वान, भक्तीप्रवण आणि धर्मनिष्ठ म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या घराण्यात जसा कर्मठपणा होता तशीच भक्तीही होती. त्यांचे वडील सूर्यनारायण व आई रूक्मिणी यांच्या निधनानंतर नाथांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी त्यांचे आजोबा आणि आजी यांचेवर आली. त्यांनी अत्यंत प्रेमाने एकनाथांचे संगोपन केले. नाथांच्या घराण्यात पिढ्यान्‌पिढ्या सूर्योपासना सुरू होती. शिवाय एकवीरा देवी ही त्यांची कुलदेवता होती. त्यामुळे भक्तीचे संस्कार त्यांच्या मनावर बालपणापासूनच रूजले होते. संध्या पूजा–पाठ, नामस्मरण हा त्यांचा आवडता छंद होता. त्यांची दांडगी स्मरणशक्ती, प्रचंड पाठांतर आणि धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास विलक्षण होता. त्यांचे गुरू जनार्दन स्वामी हे दत्तोपासक असून साक्षात्कारी पुरुष आणि आधिकारसंपन्न योगी होते. त्यांनी नाथांना अनुग्रह दिला. शिवाय नाथांकडून ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, भागवत इत्यादी ग्रंथांचा अभ्यास करवून घेतला. त्यातून नाथांची आध्यात्मिक जडणघडण झाली. ''नाथांनी प्रपंच आणि परमार्थ यांचा उत्तम समन्वय साधला होता. त्यामुळेच त्यांना 'शांतिब्रह्म' म्हणून ओळखले जाते.''[2]

नथांनी तीर्थयात्रेच्या निमित्ताने स्थानिक लोकजीवनाचा अभ्यास केला. शिवाय तीर्थयात्रेदरम्यानच चतुःश्लोकी भागवतावर ओवीबद्ध टीका लिहिली. त्याकाळी प्रचलित असणारी लोकप्रबोधनाची आणि लोकशिक्षणाची कीर्तन आणि प्रवचन ही माध्यमे निवडून नाथांनी लोकप्रबोधनाचे आणि लोकोद्वाराचे कार्य केले. आपली मराठीतीली रचना लोकांपर्यंत पोहोचायला हवी असेल, तर ती सर्व स्तरांना आपली वाटायला हवी हे जनसामान्यांशी समरस झालेल्या नाथांनी ओळखले होते. त्यामुळेच ते म्हणतात – ''ज्ञानी निवती परमार्थबोधे। पंडित निवती पदबंधे। लोक निवती कथाविनोदे। ग्रंथसंबंधे जग निवे। (भावार्थ रामायण बालकांड 14–83) नाथांनी स्वतः योगाचा आणि समाधी सुखाचा अनुभव घेतला असला तरी सामान्य जनतेच्या कल्याणासाठी प्रभावी पण सोपे परमार्थसाधन म्हणून नामस्मरणाचा उपदेश केला. 'कलियुगी नामस्मरणे। जड उद्धरणे कीर्तनी।।'' असे त्यांचे सांगणे होते. ''एकनाथांचे करुणापूर्ण आणि गुरुभक्तीने ओथंबलेले अंतःकरण भागवत निरुपणातून प्रगट झाले आहे.''[3]

संत एकनाथांनी विपूल आणि विविधांगी स्वरूपाची वाङ्मय निर्मिती केली. त्यात जसे भाष्यग्रंथ आहेत तसेच सामान्य जनतेला भक्तिमार्गाची शिकवण देण्यासाठी स्फुट रचनाही आहेत. त्यात गौळणी, गोपगोपींचे खेळ, कृष्णरूप वर्णन, विठ्ठलरूप वर्णन, पंढरी माहात्म्य, संतमहिमा, देवभक्तसंबंध, जीवाशिवाचे ऐक्य, संतचरित्रे आणि समाजात रूढ असलेल्या कर्मकांडाचे, क्षुद्र देवदेवता पूजनाचे खंडन इ. विविध विषय स्फुट अभंगातून हाताळले. नाथांनी पंथीय आचारविचारांचा पुराणप्रवचनांद्वारे प्रसार करण्यासाठी भागवताच्या एकादशस्कंदावरील टीकाभाष्य, आत्मविस्मृत समाजाला प्रयत्नवादाची शिकवण देण्यासाठी बंधविमोचकतेच्या अंगाने रामकथेचा अन्वयार्थ लावणारे भावार्थ रामायण हे प्रदीर्घ कथाकाव्य, विवाहकथेचा ताणा आणि भक्तिअध्यात्माचा बाणा यांची सुरेख गुंफण करणारे रुक्मिणीस्वयंवर हे आख्यानकाव्य, अंतरंगाने वेदांती पण बाह्यतः करता येण्याजोगी हास्यविनोदी भारूडे, भजनी मंडळीकडून भक्तिमार्गाचे मर्म ठसविण्यासाठी रचलेली गेय पदपदांतरे, गौळणी आणि अभंग अशी बहुरूपी आणि बहुमुखी रचना एकनाथांनी केली. शिवाय ''लौकिक जीवनातील एखादी व्यक्ती एखादी घटना घ्यायची व तिच्या लौकिक रूपाबरोबरच तिच्या वर्णनातून अलौकिक असा आध्यात्मिक अर्थही प्रकट करावयाचा अशी मोठी कल्पकतापूर्ण शैली भारूडात नाथांनी कौशल्याने अवलंबिली आहे.''[4] त्यामुळे पुढे त्यांच्याच प्रेरणेतून या विविध रचनाप्रकारांची परंपरा मराठीत विशेष प्रचलित झाली. ''सगुण परमेश्वराची भक्ती हीच त्याचे व आपले निर्गुणस्वरूप व ऐक्य समजण्याचे प्रमुख साधन आहे असे भागवताला अनुसरून नाथांचे मत आहे.''[5]

सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या एकनाथांच्या कवितेतील समत्वभाव हे एक श्रेष्ठ आध्यात्मिक मूल्य आहे. त्यांचा समत्वभाव हा विश्वभावाचा एक भाग आहे. 'तेथे ब्रह्मवेत्ते ब्राह्मण। का अंत्यजादि हीन जन। त्यांच्या ठायी लोटांगण। सारिखे जाण सद्भावे।। गाय गाढव सूकर श्वान। त्यांच्याही ठायी आपण लोटांगण। सद्भावे संपूर्ण घालावे।।'' यातून विश्वातील सर्व प्राणीमात्राविषयीचा नाथांचा पूज्यभाव स्प होतो. त्यांच्या रचनेवरून तत्कालीन लोकस्थितीचा पुष्कळसा अंदाज करता येतो. त्याकाळी हिंदू लोकात दावलमलकाच्या गदेचे पूजन, पीरांना नवस बोलणे आणि ताबुतात नाचणे यासारखे आचार प्रचलित झालेले होते.

एकनाथांची सर्वश्रृत आणि लोकप्रिय रचना म्हणजे भारूड. त्यांची ही रचना बहुरूढ असून भारूडाचा नेमका अर्थ – 'लोकजीवनातील विविध गोंवर केलेले आध्यात्मिक रूपक नाट्यापूर्णरीतीने व्यक्त करणारे गीत असा देता येतो. नाथांची सर्वस्पर्शी भारूडे म्हणजे भिन्नभिन्न व्यवसायधंद्यावर बसविलेली आध्यात्मिक रूपकेच आहेत. त्यातील व्यावहारिक वर्तनाच्या स्तराची दखल घेतल्यास सत्ताधारी वर्गातील स्पर्धेपायी सामान्य रयतेची कशी दैना होत होती याची सहजच कल्पना येते. नाथांनी लिहिलेल्या सुमारे तीनशे भारूडांचे अवलोकन केले की त्यातील वैविध्य सहजच लक्षात येते. नाथांच्या भारूडात ज्योतिषी, गोंधळी, जागल्या, फकीर, भोपे, वासुदेव, बाळसंतोष, वाघ्यामुरळी, भराडी, येसकर इ. विविध व्यवसाय करून आपली उपजीविका करणारे शारीरिक व्यंगाने पीडित असणारे त्याचप्रमाणे पशु–पक्षी देखील आहेत. शिवाय हमामा, पिंगा, फुगडी इ. क्रीडा प्रकारही आहेत. नाथांनी या सर्वांच्या स्वभावातील हालचाली, बोलण्याचालण्यातील वैशिष्ट्यो अगदी नेमकेपणाने टिपून त्यांना परमार्थाच्या सूत्रात गुंफून एक अद्‌भुत सृष्टी निर्माण केली आहे. त्यामुळेच नाथांच्या संदर्भात न्या. रानडे लिहितात – ''एकनाथांच्या ग्रंथात भागवतधर्म तर दिसलाच; पण चरित्रातही दिसला.''[6] त्यांच्या या विधानातून नाथांच्या उक्ती आणि कृतीची सहजच साक्ष पटते. भारूडामध्ये लौकिक जीवनातील एखादी व्यक्ती, एखादी घटना घ्यावयाची आणि तिच्या लौकिक रूपाबरोबरच तिच्या वर्णनातून अलौकिक असा आध्यात्मिक अर्थही सांगायचा अशी मोठी कल्पकतापूर्ण शैली भारूडाकरिता नाथांनी कौशल्याने अवलंबिली आहे. नाथांच्या भारूड रचनेमागील मुख्य प्रयोजन तत्कालीन समाजाचे आध्यात्मिक उद्‌बोधन किंवा धर्मजागरण हे आहे. नाथांना तत्कालीन समाजाला

भक्तिप्रवण करायचे होते, भक्तिप्रवण झाल्यास हा समाज संतांना अभिप्रेत असलेले ऐहिक जीवनाचे उद्दिष्ट—मोक्ष प्राप्त करू शकेल असा त्यांना विश्वास वाटत होता आणि म्हणूनच त्यांनी तत्कालीन समाजाला लौकिक जीवन आणि पारलौकिक जीवन यांची सीमारेषा विचारात घ्यायला बाध्य केले. त्यामुळेच डॉ. यु. म. पठाण म्हणतात — ''नाथांनी लोकरंजन करता करता धर्मजागरण केले. पारमार्थिक उद्‌बोधन केले. नाथांच्या प्रतिभेचा परिसस्पर्श झाल्यामुळेच भारूडांचे क्षरत्व गळून पडले आणि त्यांचे अक्षरत्व उजळून निघाले.''[7] लौकिक जीवनाला अपरिहार्यपणे ग्रासणारे जे दोष आहेत, त्यांच्याकडे लक्ष वेधल्यास त्या दोषांपासून, षड्‌विकारांपासून हा समाज अलिप्त राहू शकेल त्याचे हे अज्ञान ज्ञानाने न करता येईल असा विश्वास त्यांनी 'विंचू' या भारूडातून व्यक्त केला आहे. नाथ म्हणतात — 'विंचू चावला वृश्चिक चावला। कामक्रोध विंचू चावला।' कामक्रोधरूपी विंचू चावल्याने पंचप्राण व्याकुळ झाल्याचे सांगून 'मनुष्य इंगळी अति दारूण' म्हणजे महाभयंकर असल्याची ते जाणीव करून देतात. पुढे 'ह्या विंचवाला उतारा। तमोगुण मागे सारा। सत्वगुण लावा अंगारा। विंचू इंगळी उतरे झरझरा।' (विंचू—भारूड) तमोगुणांचा अव्हेर करून सत्वगुणांचा अंगीकार केल्यास षड्‌रिपूरूपी विंचू आपोआपच उतरतो असे ते पटवून देतात.

'भारूड' हा मुळात लोकगीतांचा प्रकार असल्यामुळे लोकसंस्कृतीच्या उपासकांशीही त्यांनी आपला संबंध अबाधित राखला. नाथांनी भारूडामध्ये पहाटे गीत म्हणणारा लोकसंस्कृतीचा उपासक वासुदेव, भविष्यकथन करणारा जोशी, पिंगळा, डमरूवाला, डोंबारी याशिवाय आंधळा, पांगळा, बहिरा, मुका, शकुन, कोल्हाटी, चोपदार इ. जनसमुदायाचे दर्शन घडविले आहे. इतकेच नाही तर कुत्रे, पोपट, एडका यासारखे प्राणीही विचारात घेतले आहे. यावरून लोकजीवनाशी जवळीक साधणे हा नाथांच्या भारूडाचा महत्त्वाचा विशेष आहे हे लक्षात येते. विविध सण, समारंभ आणि त्यातील विधी, लपंडाव, टिपरी, फुगडी, हुतूतू यासारखे खेळ अथवा भुत्या, वाघ्या, संन्यासी, भटीण, कुंटीण, नकटी, सौरी, माळी, जंगम, बायला, दादला अशासारख्या समाजातील विविध वृत्ती—प्रवृत्तीच्या व्यक्ती अथवा होळी, शिमगा सारख्या सणाच्या प्रथेवर नाथांनी रचलेली आध्यात्मिक रूपके लोकजीवनाला दिशा देणारी त्यांच्यात प्रबोधनाच्या पाऊलखुणा रुजविणारी आहे. या प्रत्येक विषयाचे लौकिक स्वरूप एकनाथ वर्णन करतात त्यावरून त्यांच्या चौफेर निरीक्षणाची जशी कल्पना येते तशीच त्यातून त्यांची आध्यात्मिक प्रगल्भताही सिद्ध होते.

एकनाथांनी अर्जदास्त, ताकीदपत्र यासारख्या भारूडातून तत्कालीन राजकीय, शासकीय व्यवहाराचेही दर्शन खुमासदारपणे घडविले आहे. तर त्यांच्या हिंदू—तुर्क संवादासारख्या भारूडातून त्याकाळी इस्लाम धर्माशी घडणारा संघर्ष प्रतीत होतो. ''हिंदुकु तुरक कहे काफर। तो म्हणे विटाळ होईल परता सर। दोन्हींशी लागली करकर। विवाद थोर मांडला।।' (हिंदु—तुर्क संवाद) परंतु येथे नाथांची भूमिका समन्वयाची असून दोन्ही धर्म परमार्थाकडेच नेणारे असल्यामुळे धर्माच्या नावावरून विवाद करणे व्यर्थ असल्याचे नाथांनी पटवून दिले आहे. परमार्थाच्या मार्गात जातीपातीचे, श्रेष्ठ—कनिष्ठतेचे सगळे भेद निरर्थक, अज्ञानमूलक असल्याची नाथांची भूमिका यातून अत्यंत परखडपणे व्यक्त झालेली आहे.

नाथांच्या 'जोहार' या भारूडात ब्राह्मण आणि महार यांचा संवाद लक्षवेधक ठरलेला आहे. अहंकाराने ग्रासलेला ब्राह्मण 'हे विश्व निर्गुण परमात्म्यापासून निर्माण झाले या अर्थी आपले आईबाप एकच आहेत.' हे महाराचे बोधप्रद विधान ऐकून शांत होतो. या भारूडातून नाथांचा स्पवक्तेपणा आणि तत्कालीन परिस्थितीत त्यांची आपल्या विचारावरील निष्ठा व्यक्त करण्यातील सडेतोडपणा सहजच लक्षात येतो. कमीत कमी शब्दात प्रापंचिक जनांना प्रबोधन करण्याची तळमळ नाथांच्या प्रत्येक भारूडामागे दडलेली आहे. नाथांचे 'वासुदेव' हे भारूड देखील आदर्श भक्ताचे आचरण कसे असावे हे दर्शविणारे आहे. नाथांचा वासुदेव म्हणतो — ''सांडोनी सर्व चिंता संतपदी लक्ष लागो। मुक्त मी सर्वसंगी सर्वदा वृत्ति जागो। भाविक प्रेमळांच्या संगती चित्त लागो।।'' संत सज्जनांच्या चरणी आपले लक्ष केंद्रीत होऊन प्रेमळ भक्ताचा सहवास लाभावा अशी कामना हा वासुदेव करतो. यातून सत्‌संगतीचे महत्त्वच नाथांनी पटवून दिले आहे.

नाथांचे समाजनिरीक्षण जेवढे सूक्ष्म होते तेवढीच त्यांची सहानुभूती व्यापक होती. अत्यंत दुराचारी लोकही जर पश्चात्ताप होऊन भक्तिमार्गाला लागले तर त्यांचा उद्धार होतो हा भक्तिमार्गाचा सिद्धांत त्यांनी लोकमनात रुजविण्याचा प्रयत्न केला. अविचारामुळे संसारात खऱ्या शाश्वत सुखाची प्राप्ती होणे शक्य नाही याची जाणीव 'दादला' या भारूडातून करून देताना 'मोडकेसे घर तुटकेसे छप्पर। देवाला देवघर नाही।। मला दादला नलगे बाई।।' असे सांगून 'एका जनार्दनी समरस झाले। तो रस येथे नाही।।' घराचे रूपक साधून देहाची नश्वरता येथे

नाथांनी पटवून दिली आहे. या भारूडात सद्बुद्धीरूपी नारी आपल्या फाटक्या, नश्वर संसाराची व्यथा आपल्या सखीला सांगते आहे आणि शेवटी भगवंतालाच पती मानून त्याच्याशी तादात्म्य पावते.

याचप्रमाणे नाथांचे 'थट्टा' हे भारूड बाह्यता रंजनप्रधान असले तरी वस्तुतः विषयासक्त माणसाच्या डोळ्यात अंजन घालणारे प्रबोधनप्रधान आहे – 'अशी ही थट्टा। भल्याभल्यासि लाविला बट्टा।। ब्रह्मदेव त्रैलोक्याला शोधी। थट्टेने हारविली बुद्धी।' मोठमोठ्याा देवांचीही विषयासक्तीमुळे कशी फजिती झाली हा विचार येथे सूचित करून शेवटी 'थट्टेने मेला दुर्योधन। भस्मासुर गेला भस्म होऊन। वालीही मुकला आपुला प्राण। अशी ही थट्टा।।'' असे सांगून या थट्टेपासून म्हणजेच विषयासक्तीपासून मनुष्याने दूर रहावे याची जाणीव नाथ करून देतात.

नाथांच्या 'भटीण' या भारूडातील 'भटीण' म्हणजे कुबुद्धी आणि 'भट' म्हणजे जीव आहे. विवेकाने सावध झालेल्या भटाच्या म्हणजे जीवाच्या लक्षात येते की या कुबुद्धीमुळे आपण मोहात अडकलो होतो. तेव्हा तो कुबुद्धीरूपी भटीणीला उपदेश करतो. त्यामुळे तिची चंचलता न होऊन ती सद्गुरूला शरण जाते. नाथांचा 'आंधळा' हा पारमार्थिक अंधत्व आलेला आंधळा असून सद्गुरूकृपेने आत्मस्वरूप पाहण्याची दिव्यदृष्टी त्याला लाभली आहे. त्यांचा 'बहिरा' इंद्रियसुखाच्या मागे लागल्यामुळे आपण भगवंताचे नाव ऐकले नाही अशी खंत व्यक्त करतो. तर 'संन्यासी' या भारूडातून नाथांनी दांभिक संन्यासावर कोरडे ओढले आहे. नाथांची 'सौरी' – 'सहा दादुले केले परि म्यां ऐसा नाही देखिला दादुला।' असे सांगून जे समाधान सहा दुदुल्याकडून म्हणजेच काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इ. कडून मिळू शकले नाही ती तृप्तता एका परमेश्वराने बहाल केल्याचे सांगते. 'कुत्रे' या भारूडातूनही नाथांनी अहंकारी लोकांची चांगलीच कानउघडणी केली आहे.

सामाजिक प्रबोधनाच्या दृीने एकनाथांच्या भारूडांचे स्वतःचे असे एक असाधारण स्थान आहे. विविध वैशिष्ट्याांनी, वैविध्यांनी आणि अंगभूत गुणांनी नाथांची ही भारूडे नटलेली आहेत. नाथांनी या भारूडांच्या माध्यमातून लोकरंजन करता करता जसे धर्मजागरण केले त्याचप्रमाणे पारमार्थिक व मानवी मनाला उद्बोधन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. समाजातील दुर्गुण, दुपणा, दंभ, ढोंग, विषमता, स्वार्थ, द्वेष, मत्सर इत्यादी दोषांवर कठोर टिका करून मानवी समता आणि सद्भाव या सामाजिक सद्गुणांचा पुरस्कार केला. त्यादृीने संत एकनाथ हे खऱ्या अर्थाने 'लोकनाथ' ठरतात. भारूडाच्या माध्यमातून त्यांनी जे लोकशिक्षणाचे कार्य केले ते आजही अतुलनीय आणि मार्गदर्शक ठरणारे आहे. नाथांनी समाजातील नानाविध घटकांचे त्यांच्यातील वृत्ती–प्रवृत्तीचे दर्शन घडवून त्यांच्यात मूल्य रुजविण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी पार पाडलेली लोकशिक्षकाची भूमिका आजही समाजसुधारणा करणाऱ्यांना बोधप्रद ठरावी अशीच आहे.

## संदर्भ :


1. संत साहित्य : अभ्यासाच्या काही दिशा – (संपा.) डॉ. कल्याण काळे, रा. शं. नगरकर – स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – 1992, पृ. 16
2. महाराष्ट्रातील पंथ – सुहास आगरकर – डायमंड पब्लिकेशन पुणे, 2009, पृ. 76
3. संतकाव्य संचित – डॉ. उषा देशमुख – माया प्रकाशन, नागपूर – 2000 पृ. 138
4. एकनाथ वाङ्मयदर्शन – (संपा.) भगवंत देशमुख – साहित्य अकादेमी, दिल्ली – 2003, पृ. 17
5. महाराष्ट्राचा भागवत धर्म : संत एकनाथ – डॉ. शं. दा. पेंडसे – कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे – 1971, पृ. 77
6. वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य – (संपा.) डॉ. शिवाजीराव मोहिते – कर्मवीर प्रकाशन, पुणे – 2008, पृ. 215
7. संत एकनाथ दर्शन – (संपा.) डॉ. हे. वि. इनामदार – कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे – 1983, पृ. 115